# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः17.03.2026** **वारः मंगळवार**

---

•महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक विधानसभेत आवाजी मतदानाने मंजूर
•आसाम, केरळम आणि पुदुच्चेरी विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ
•परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांची युरोप महासंघातील देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांशी चर्चा
•नवतेज सरना, ममता कालिया, राजू बाविस्कर यांच्यासह विविध भाषांमधील लेखकांना साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर
आणि
•काबूलमधल्या रुग्णालयावर पाकिस्ताननं केलेल्या हवाई हल्ल्यात ४०० लोकांचा मृत्यू

**<u>विधीमंडळ</u>**
सक्तीने आणि प्रलोभन दाखवून होणाऱ्या धर्मांतराला प्रतिबंध घालणारं महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक काल विधानसभेत आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आलं. हे विधेयक कोणत्याही धर्माच्या विरोधात नसून बेकायदा धर्मांतराला प्रतिबंध करण्यासाठी आहे, असं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधेयकावर चर्चेला सुरुवात करताना सांगितलं. या विधेयकानुसार बेकायदा धर्मांतरासाठी केलेला विवाह रद्द केला जाईल, असं मुख्यमंत्री म्हणाले. कोणत्याही व्यक्तीला अथवा संस्थेला धर्मांतर करण्यासाठी योग्य त्या प्राधिकरणाकडे आगाऊ नोटीस द्यावी लागेल. त्यानंतर संबंधित प्राधिकरण हे अशा पद्धतीचं धर्मांतर योग्य आणि स्वच्छेनं आहे की नाही याची चौकशी करेल. अशी नोटीस दिली नसेल तर सदर धर्मांतर रद्द केले जाईल. अशा धर्मांतरातून लग्न होऊन नंतर लग्नविच्छेद झाल्यावर तो विवाहदेखील रद्द ठरवण्याचा अधिकार न्यायालयांना असणार आहे. अशा पद्धतीच्या धर्मांतराबद्दल असलेल्या तक्रारी केवळ रक्ताच्या नात्याकडून असलेल्या नातेवाईकांना अथवा पोलिसांना करता येतील. यासाठी विविध पातळ्यांवर दंडाची आणि कारावासाची तरतूद केली आहे, अशी माहिती देखील मुख्यमंत्र्यांनी दिली.
अनेक वेळा धर्मांतराच्या मुद्द्यावर कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होते. प्रचलित कायद्यात याबाबत सुस्पष्ट तरतुदी नाहीत, त्यामुळे नव्या कायद्याची गरज आहे असं मुख्यमंत्री म्हणाले.

धर्मस्वातंत्र्य विधेयक हे संविधानाच्या विरोधात आहे अशी टीका अस्लम शेख यांनी केली. यामुळे दोन सज्ञान व्यक्तींना एकमेकांशी विवाह करायचा असेल आणि त्यांच्या कुटुंबियांनी तक्रार केली तर त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जाईल अशी भीती शेख यांनी व्यक्त केली.

धर्मस्वातंत्र्य विधेयकानुसार ज्याच्यावर धर्मांतर घडवून आणल्याचा आरोप आहे त्यालाच निर्दोषत्व सिद्ध करावं लागणार आहे, ही अन्याय्य बाब असून यामुळे गैरवापर होईल, अशी भीती भास्कर जाधव यांनी व्यक्त केली. याचा सरकारनं फेरविचार करावा अशी सूचना त्यांनी केली.

हे विधेयक एकतर्फी असून केवळ एका धर्माला लक्ष्य करण्यासाठी आहे असा आरोप समाजवादी पक्षाचे सदस्य रईस शेख यांनी यावेळी केला. ज्या अहवालाच्या आधारे हे विधेयक सादर केलं आहे तो अहवाल कुठं आहे, असा सवाल करत त्यांनी विधेयकाला विरोध केला.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी या विधेयकाला पाठिंबा असल्याचं विधिमंडळ परिसरात वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

**विधानसभा**

आसाम, केरळम आणि पुदुच्चेरीमधल्या विधानसभा निवडणुकीची अधिसूचना काल जारी करण्यात आली. त्यानंतर उमेदवारी अर्ज भरण्यास सुरूवात झाली आहे. आसाम, केरळम आणि पुदुच्चेरीतील मतदान ९ एप्रिलला होणार असून मतदानाची मोजणी ४ मे रोजी होणार आहे.

या निवडणुकीसाठी भाजपानं केरळममधल्या ४७ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. केंद्रीय मंत्री जॉर्ज कुरियन यांना कांजीरापल्ली इथून तर प्रदेशाध्यक्ष आणि माजी केंद्रीय मंत्री राजीव चंद्रशेखर यांना नेमोम इथून उमेदवारी देण्यात आली आहे.

पश्चिम बंगालमधल्या विधानसभा निवडणुकीसाठी देखील भाजपानं १४४ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. कोलकात्यातल्या भबानीपुर विधानसभा मतदार संघातून सुवेंदू अधिकारी यांना पक्षानं उमेदवारी दिली आहे.

पश्चिम बंगालमधे निवडणूक आयोगाने मुख्य सचिव, गृह सचिव, पोलिस महासंचालक आणि कोलकाताच्या पोलिस आयुक्तांची बदली केली आहे.

**राज्यसभा**

राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी काल मतदान झालं. १० राज्यांमधल्या ३७ रिक्त जागांपैकी २६ जागा बिनविरोध निवडुन आल्या आहेत. त्यात महाराष्ट्रातल्या ७ जागांचा समावेश आहे. महाराष्ट्रातून भाजपचे रामदास आठवले, माया ईवनाते, रामराव वडकुते, विनोद तावडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे पार्थ पवार, शिवसेनेच्या ज्योती वाघमारे आणि महाविकास आघाडीचे शरद पवार यांची बिनविरोध निवड झाली आहे.

उर्वरित 11 जागांसाठी काल मतदान झालं. या निवडणुकीत भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीएची सरशी झाली आहे. बिहारमधील सर्व पाच जागांवर एनडीएनं विजय मिळवला आहे. ओदिशातील चारपैकी दोन जागांवर भाजपा, एका जागेवर बिजू जनता दल, तर एका जागेवर अपक्ष उमेदवार निवडून आला आहे. हरियाणातील दोन जागांपैकी एक भाजपाला आणि एक कॉंग्रेसला मिळाली आहे.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात

**<u>परराष्ट्रमंत्रीयुरोप</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी काल ब्रसेल्समध्ये युरोप महासंघातील देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची भेट घेतली. इराणमध्ये तसंच युक्रेनमध्ये सुरू असलेला संघर्ष आणि भारत- युरोप संबंध अधिक बळकट करण्याच्या मुद्दयावर यावेळी चर्चा झाली. युरोपियन महासंघाचे परराष्ट्र आणि सुरक्षा धोरण प्रमुख काजा कलास यांच्या आमंत्रणावरून या गटाच्या परराष्ट्र व्यवहार परिषदेच्या बैठकीला उपस्थित राहाण्यासाठी डॉक्टर जयशंकर बेल्जियम दौऱ्यावर आहेत. जयशंकर यांनी युरोपियन आयोगाच्या अध्यक्षा उर्सुला फॉन डेर लेयन, यांच्यासह जर्मनी, ग्रीस, स्लोवाकिया आणि नेदरलँडस् या देशांच्या समपदस्थ मंत्र्यांची भेट घेतली.

लेयन यांचा भारत दौरा हा उभय देशांतील संबंधांमधला महत्त्वपूर्ण टप्पा ठरला असल्याचं जयशंकर म्हणाले.

या परिषदेत होर्मूझच्या सामुद्रधुनीतील सागरी वाहातुकीचे अधिक चांगले संरक्षण कसे करता येईल यांवर चर्चा झाल्याचे कलास यांनी सांगितले. याच वेळी जय़शंकर यांनी काल जर्मनी, स्लोवाकिया, ग्रीस आणि नेदरलँडस् या देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांपची भेट घेतली.

**<u>शिवालिक</u>**

कतारहून ४६ हजार मेट्रिक टन एलपीजी घेऊन येणारं शिवालिक हे जहाज काल गुजरातमधील मुंद्रा बंदरात पोहोचलं. बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. एलपीजी वाहून नेणारं नंदा देवी हे आणखी एक भारतीय जहाज आज पोहोचेल, असंही त्यांनी सांगितलं. युएईहून निघालेलं भारतीय ध्वजधारी जग लाडकी हे जहाज सुरक्षितपणे भारतात पोहोचलं असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<u>भारतीय प्रवासी</u>**

कतार एअरवेजच्या विमानांतून काल 1,100 भारतीय प्रवासी नवी दिल्ली, मुंबई, कोची आणि इतर ठिकाणी रवाना झाले असल्याची माहिती दोहा मधल्या भारतीय दुतावासानं दिली. आजही ही उड्डाणं होणार असून, कतार एयरवेज उद्यापासून अहमदाबाद, अमृतसर, बेंगलुरु, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, कोची, कोझिकोड आणि मुंबई साठी विमानं सोडणार आहे.

**<u>साहित्यअकादमी</u>**

2025 या वर्षासाठीचे साहित्य अकादमीचे पुरस्कार काल जाहीर झाले असून , परराष्ट्र सेवेतले निवृत्त अधिकारी नवतेज सरना यांच्या Crimson Spring या पुस्तकाला इंग्रजी भाषेसाठीचा तर ममता कालिया यांच्या जीते जीते अलाहाबाद या पुस्तकाला हिंदी भाषेसाठीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. हेन्री मेन्डोन्सा यांच्या कोकणी काव्यम - रुपानी आणि रुपकम या पुस्तकाला कोकणी भाषेसाठी साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे.

ज्येष्ठ चित्रकार राजू बाविस्कर यांच्या काळ्यानिळ्या रेषा या आत्मचरित्राला यंदाचा मराठी भाषेसाठीचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. बाविस्कर हे सेवानिवृत्त कलाशिक्षक असून जळगाव जिल्ह्यात ते कार्यरत होते. १ लाख रुपये, मानचिन्ह आणि शाल असं या पुरस्काराचं स्वरुप असून ३१ मार्च रोजी नवी दिल्लीत त्याचं वितरण होणार आहे.

**<u>अमृत उद्यानपूल</u>**

राष्ट्रपती भवनातील अमृत उद्यान आज केवळ ज्येष्ठ नागरिकांसाठी खुलं करण्यात येणार आहे. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय, राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश यांच्या सहकार्याने या उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. ही भेट ज्येष्ठ नागरिकांना अमृत उद्यानाची सुंदरता अनुभवण्यासाठी तसंच त्यांचा सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग वाढविण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे.

**<u>ट्युलिपबाग</u>**

आशियातली सर्वात मोठी असलेली , जम्मू काश्मीरच्या श्रीनगरमधली ट्युलिप बाग काल पर्यटकांसाठी खुली करण्यात आली. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी काल या ट्युलिप शोचं उद्घाटन केलं. दल सरोवराच्या झबरवाँ पर्वत रंगांच्या पायथ्याशी असलेली ही बाग स्थानिक, देशांतर्गत आणि विदेशी पर्यटकांचे स्वागत करण्यासाठी सज्ज झाली आहे. यावर्षी सुमारे १८ लाख ट्युलिपच्या ७० हून अधिक प्रकारांसह, एक लाख इतर फूलझाडं ही फुलली आहेत. मुख्यमंत्र्यांनी जगभरातल्या पर्यटकांना वसंत ऋतु दरम्यान जम्मू आणि काश्मीरला भेट देण्याचे आणि त्याच्या अद्वितीय निसर्गसौंदर्याचा अनुभव घेण्याचं आवाहन केलं.

**<u>पाकिस्तान हल्ला</u>**

अफगाणिस्तानची राजधानी काबूलमधल्या एका रुग्णालयावर पाकिस्ताननं काल रात्री केलेल्या हवाई हल्ल्यात किमान ४०० लोकांचा मृत्यू झाला असून २५० जण जखमी झाल्याचा अंदाज आहे. या हवाई हल्ल्यात रुग्णालयाचा मोठा भाग उद्ध्वस्त झाला असून, मृतांच्या संख्येत वाढ होऊ शकते असं तालिबानच्या प्रवक्त्या जबीहुल्ला मुजाहिद यांनी सांगितलं. पाकिस्तानी सैन्यांनं पुन्हा एकदा अफगाणिस्तानच्या हवाई क्षेत्राचं उल्लंघन केलं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार